
REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 9 | ISSUE - 5 | FEBRUARY - 2020

# तहान आणि बारोमास : वैदर्भीय सामाजिक जाणीवांचा दस्तऐवज

प्रा.डॉ.भगवान नन्नावरे
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख,
अण्णासाहेब गुंडेवार महाविद्यालय, नागपूर.

**KEY NOTE :** समकालीन वैदर्भीय ग्रामीण समाजवास्तव कवेत घेणाऱ्या महत्त्वपूर्ण कादंबऱ्या तहान आणि बारोमास.

**ABSTRACT :** सदानंद देशमुख यांनी आपल्या सभोवतालाशी प्रामाणिक राहून समकालीन ग्रामीण समाजवास्तवाचे नेमके आकलन आपल्या कादंबरी लेखनातून व्यक्त केले आहे. विदर्भातील शेतकरी व्यथा वेदना प्रकर्षाने जाणवून देणाऱ्या महत्त्वपूर्ण कादंबऱ्या म्हणून तहान आणि बारोमास चा विचार करावा लागतो.




## प्रास्ताविक :

महाराष्ट्राच्या ग्रामीण समाज जीवनाचे वास्तव चित्र घेऊन साकार झालेला ग्रामीण साहित्याचा प्रवाह १९८० नंतर अधिक गतिमान झालेला होता. आजच्या ग्रामीण समाज वास्तवाचे अनेक पदर ग्रामीण जीवन अनुभवणाऱ्या लेखकांच्या अंतर्मनातील पडसादासह ग्रामीण साहित्यातून साकार झाले आहेत. बदलत्या समाजव्यवस्थेने ग्रामीण माणसांच्या जीवनात निर्माण केलेले प्रश्न आणि त्याने ग्रामीण समाजव्यवस्थेची दिवसेंदिवस विस्कटत जाणारी घडी अनेक कादंबरीकारांनी अनुभवली होती. त्याचाच वास्तवदर्शी पट त्यांनी आपल्या कादंबरीलेखनातून व्यक्त केलेला दिसून येतो. अशाच आजच्या ग्रामीण कादंबरी लेखकांच्या परंपरेतील महत्त्वाचे ग्रामीण कादंबरीकार म्हणजे सदानंद देशमुख होय.

महाराष्ट्र हा वेगवेगळ्या भौगोलिक प्रदेशाने विभागला गेलेला दिसून येतो. यामध्ये मराठवाडा, विदर्भ, कोकण, पश्चिम महाराष्ट्र, असे प्रमुख विभाग मानले जातात. त्या त्या विभागाची भौगोलिक रचना असून, त्यानुसार तेथे व्यवसाय, सण—उत्सव, रूढी, परंपरा यानुसार लोक जीवन जगत राहतात. याच भौगोलिक प्रदेशातील विदर्भ या प्रदेशात सामान्य शेतकरी कुटुंबात जन्माला आलेले सदानंद देशमुख यांनी वैदर्भीय सामाजिक जीवनाचा तळस्पर्शी वेद आपल्या कादंबरी लेखनातून घेतलेला आहे. आजच्या ग्रामीण महाराष्ट्राचे वास्तवदर्शी चित्रण त्यांच्या कादंबरी लेखनातून अनुभवास येते. त्यांच्या 'तहान' आणि 'बारोमास' या दोन कादंबरीतून साकार झालेले विदर्भातील समाजजीवन हे विदर्भाच्या सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, राजकीय जीवन क्षेत्राचा दस्तऐवज ठरावेत एवढे परिपूर्णतेने साकार झालेले आहे. अशा जीवन वास्तवाचा वेध घेणाऱ्या या दोन कादंबऱ्यातून साकार झालेल्या सामाजिक जीवन चित्रणाचे वेगवेगळे पैलू प्रस्तुत शोधनिबंधाच्या अनुषंगाने विचारात घेता येतील.

महाराष्ट्रातील काही भौगोलिक प्रदेश हे अवर्षण प्रवण क्षेत्रात येतात. या प्रदेशात दोन, चार वर्षातुन पडणारा दुष्काळ सातत्याने

तिथल्या सामाजिक जीवन वास्तवाला उध्वस्त करीत आलेला आहे. विदर्भातील काही प्रदेश हा अवर्षणग्रस्त प्रदेश म्हणून ओळखला जातो. विदर्भातील सामाजिक परिस्थितीचे नेमके चित्र समोर ठेवताना डॉ.माधव जाधव लिहितात,''विदर्भ हा भौगोलिक दृष्टीने सुरक्षित असलेला प्रदेश. इतर प्रदेशांच्या तुलनेत विदर्भातील शेती ही सर्वसाधारणच. दऱ्याखोऱ्यात वसलेल्या गावांमधील शेतकऱ्यांच्या शेतीतील ओलित करणे एकूणच कठीण. विहीर खोदावी, ओलित करावे या आशेने कर्ज काढून अथवा वावर विकून विहीर खोदणाराच्या पदरी शेवटी निराशाच येते. नापिकी, सिंचनाचा अभाव, यामुळे इथला अन्नदाता नेहमीच कंगाल असतो. हरितक्रांतीचे स्वप्न पाहणाऱ्या या देशात सरकारला स्वातंत्र्याच्या साठ वर्षांनंतरही शेतीकडे पाहण्याचादृष्टीकोन बदलता आला नाही. शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करणाऱ्या मंडळीकडून त्यांचे शोषण होते. सरकार जरी शेतकऱ्यांसाठी योजना आखत असली तरी त्यांचा प्रभावी अंमल होत नाही. भ्रष्ट शासकीय अधिकारी व कर्मचारी या योजना गरजू लोकांपर्यंत पोहोचू देत नाहीत. विभक्त कुटुंब पद्धती, दुष्काळ, जोडधंद्याचा अभाव, वाढलेला खर्च, तरुणांची बेकारी व कौटुंबिक संघर्ष या कारणामुळे शेतकरी हवालदिल होतो.''[१] अशा भयान समाज वास्तवात जीवन जगणाऱ्या विदर्भातील शेतकऱ्यांच्या दु:खांची गाथा गाण्याचे काम अनेक ग्रामीण कादंबरीकारांनी त्या—त्या काळानुरुप केलेले दिसून येते.

दुष्काळामुळे उद्धवस्त झालेल्या विदर्भातील गाव खेड्याची होत जाणारी वाताहत, त्याचबरोबर अशा परिस्थितीत गावातील पुढाऱ्यांकडून होणारा भ्रष्टाचार, दोन पिढीतील वाढत जाणारे अंतर, जुन्या आणि नव्या विचाराचा संघर्ष, चंगळवादी जीवन संस्कृतीच्या आहारी जाणारी आजची पिढी अशा एक ना अनेक समकालीन जीवन प्रश्नांना कवेत घेऊन साकार होणारी सदानंद देशमुख यांची 'तहान' ही कादंबरी अशा विविधात्मकतेतून कशी साकार होते. याविषयी भाष्य करताना प्रा.लक्ष्मीकांत यळवंडे लिहितात,''महाराष्ट्रातील निसर्गचक्रातच दुष्काळ आहे. त्यामुळे दुष्काळी परिस्थिती उद्‌भवणार हे राजकारण्यांना व नियोजनकर्त्यांना माहित आहे. तरीही दुष्काळावर मात करण्यासाठी ठोस कार्यक्रम ते जनतेला देऊ शकले नाहीत. कृषी, औद्योगिक, शैक्षणिक, सिंचन, सामाजिक न्याय, संशोधन यावर प्रामुख्याने विचार होणे आवश्यक आहे. पण तो केला जात नाही, हे जाणवत राहते. स्वातंत्र्य मिळून साठ वर्ष झाली तरी, अशा प्राथमिक सुविधा उपलब्ध होऊ शकल्या नाहीत, ही खंत मनाला अस्वस्थ करणारी आहे. पाणीटंचाईचे हे वास्तव लक्षात घेऊन सदानंद देशमुख यांनी 'तहान' कादंबरी लिहिली.''[२] प्रा.येळवंडे यांनी अधोरेखित केलेल्या या मतावरून हे स्पष्ट होते की, समकालीन समाज जीवनातील वास्तव प्रश्नांचे नेमके आकलन झाल्यामुळेच सदानंद देशमुख यांची तहान ही कादंबरी वैदर्भीय सामाजिक जीवनाला केंद्रस्थानी ठेवून अभिव्यक्त झालेली आहे.

'पाणी' समस्येला केंद्रस्थानी ठेवून सदानंद देशमुखांनी तहान मधील 'सारंगपूर' या खेड्याच्या आधारे विदर्भातील ग्रामीण समाज वास्तवाचा नेमकेपणाने धांडोळा घेतलेला आहे. भीषण पाणी टंचाई निर्माण झाल्यामुळे सारंगपूर आणि परिसरात पिण्याच्या पाण्याबरोबरच अनेक समस्या निर्माण होतात आणि त्यातून समाजजीवनात घडत जाणाऱ्या घटना आणि प्रसंगांद्वारे सदानंद देशमुख यांनी तृतीय पुरुषी निवेदनातून विदर्भाच्या सामाजिक जीवनाचा नेमका परिचय करून दिलेला आहे. 'बबन शेवाळे' आणि 'राघोजी' या दोन व्यक्तिरेखांच्या निमित्ताने उद्‌भवलेला जुन्या आणि नव्या विचारांचा संघर्ष खऱ्या अर्थाने वाचकाला विचारप्रवृत्त करून सोडतो. राघोजी हा आपल्या बैलावर नितांत प्रेम करणारा संवेदनशील मनाचा शेतकरी आहे. तर त्याच शेतकऱ्यांच्या पोटी जन्माला आलेला परंतु, संवेदनाशून्य असणारा आणि केवळ स्वार्थापोटी मुक्या बैलांचा विचार न करता आपला हेतू साध्य करण्यासाठी बैलांची हेळसांड करणारा बबन शेवाळे ही आजच्या ग्रामीण भरकटलेल्या तरुणांचे प्रतिनिधित्व करणारी व्यक्तिरेखा आहे. 'रामकोर' ही व्यक्तिरेखा जुन्या आणि नव्याच्या द्वंद्वात सापडलेली दिसून येत असली तरी तिने राघोजी बरोबर कष्टाने संसार करून आपले कुटुंब सावरण्याचा प्रयत्न केलेला आहे. तिने सातत्याने कष्ट करूनही तिच्या वाट्याला सदैव दु:ख आल्यामुळेच बबनच्या रूपाने मिळणारा पैसा तिला गोड वाटू लागतो. म्हणूनच रामकोरच्या रूपाने साकार झालेली शेतकरी कुटुंबातील स्त्री, तिचे ढोर कष्ट लेखकाने नेमकेपणाने चित्रित केले आहे. तर 'रत्ना' या व्यक्तिरेखेच्या रूपाने ग्रामीण समाजजीवनातील प्रेमसूलभ भावनांचा अविष्कारही या कादंबरीत झालेला आहे. रत्ना ही बबनच्या पैशाशी संधान साधून त्याच्या प्रेमात पडते. इतर मुलींपेक्षा बबनला रत्ना जवळची आणि आकर्षक वाटू लागते. यातून त्या दोघांमध्ये प्रेमाचा धागा गुंफला जातो. त्या पार्श्वभूमीवर

घडणारे वेगवेगळे प्रसंगही या कादंबरीतून चित्रित होतात. दुष्काळासारख्या भयंकर प्रश्नाला केंद्रस्थानी ठेवून लिहिली गेलेली ही कादंबरी अशा काही प्रसंगातून विदर्भाच्या सामाजिक जीवनातील वेगळे अंग दाखविण्याचा प्रयत्न करत असली तरी या कादंबरीचे केंद्र मात्र प्रारंभापासून अखेरपर्यंत टिकून राहिलेले दिसून येते. ही कादंबरी केवळ एका व्यक्तीची, एका कुटुंबाची किंवा एका गावाची न राहता ती तत्कालीन एकूणच सामाजिक वास्तवाचे प्रतिनिधित्व कशी करते, कादंबरीच्या या महत्त्वपूर्ण वैशिष्ट्यवर नेमकेपणाने प्रकाश टाकताना डॉ.द.ता. भोसले लिहितात,''तहान' कादंबरी वाचताना आणि वाचून झाल्यावर ही एक शेवाळे कुटुंबाची कुटुंब कथा आहे. आणि या कथेचा नायक बबन शेवाळे हा आहे. अशी आपली धारणा होते. अशी झालेली धारणा चुकीची नाही. पण, एवढ्यापुरतीच ही कादंबरी सीमित नाही. ही कादंबरी जशी शेवाळे कुटुंबाची आहे. तशी संपूर्ण गावची कथा आहे. अवघ्या पारखेड गावची आहे. शेवाळे सारख्या अनेक कुटुंबांची ही कथा आहे. त्यामुळे या कादंबरीला एकाच वेळी जसे कुटुंब कथेचे स्वरूप प्राप्त झालेले आढळते. तसेच साऱ्या गावच्या समूह चित्राचेही स्वरूप प्राप्त झालेले आढळते. व्यक्तीच्या माध्यमातून समष्टीचे, एका कुटुंबाच्या माध्यमातून समूह जीवनाचे, तात्कालिक प्रसंगाच्या माध्यमातून चिरकालीन प्रश्नांचे दर्शन घडवणारी कलाकृती श्रेष्ठ मानली जाते.''[३] डॉ.भोसले यांनी या कादंबरीतून साकार झालेल्या सामाजिक जीवनाची सार्वत्रिकताही नेमकेपणाने अधोरेखित केली आहे. म्हणूनच तहान ही कादंबरी वैदर्भीय सामाजिक जीवनाचा दस्तऐवज ठरते असे म्हणने वावगे ठरणार नाही.

सदानंद देशमुख यांनी तहान कादंबरीच्या रूपाने महाराष्ट्रातील एका ज्वलंत आणि महत्त्वपूर्ण प्रश्नाला हात घातला आहे. खरे तर हा प्रश्न केवळ विदर्भाच्या पार्श्वभूमीपुरताच मर्यादित नाही. तर, तो एकूणच महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनाला परंपरेपासून ग्रासून असलेला प्रश्न आहे. या कादंबरीच्या निमित्ताने सदानंद देशमुख यांनी दुष्काळासारख्या भयंकर समस्येपुढे माणसाने आजही कसे हात टेकलेले आहेत ते दाखवून दिले आहे. म्हणूनच सामाजिक जीवनातील या महत्त्वपूर्ण प्रश्नांवर आजच्या काळातही सखोलतेने चर्चा होणे गरजेचे असल्याची जाणीव या कादंबरीच्या निमित्ताने वाचकांना झाल्याशिवाय राहत नाही. या कादंबरीतून दुष्काळासारख्या समस्येचे नेमके आकलन तर होतेच, पण बरोबरीने बदलत्या काळात भौतिक सुखाच्या मायावी मृगजळामागे धावणाऱ्या ग्रामीण समाजातील आजच्या तरुणांची होणारी ससेहोलपटही ग्रामीण महाराष्ट्राच्या शोकात्मकेला कारण ठरू शकते, हाही विचार पुढे येतो. काळाने सामाजिक जीवनात उभे केलेल्या जीवघेण्या प्रश्नांचे सूतोवाच करणारी ही कादंबरी म्हणूनच महत्त्वपूर्ण ठरते. कादंबरीतील या महत्त्वाच्या अंगावर भाष्य करताना डॉ.आशा सावदेकर लिहितात,''तहान ही फक्त पाण्यासाठी वाट पाहण्याची कहाणी नाही, ती मानवी जगण्याला चिकटलेली चौनीची, स्वार्थाची, राजकीय डावपेचांची, दुसऱ्याचे पाय ओढण्याची, खचलेल्याला हव्या असलेल्या विजयाची, तर विजयी माणसाला हवे असलेल्या धुंदीच्या तृष्णेची कहाणी आहे.''[४] डॉ.सावदेकर यांनी ही कादंबरी समकालीन सामाजिक जीवनातील प्रश्नांचे नेमके चित्र कशी अधोरेखित करते ते स्पष्ट केले आहे. समकालीन प्रश्नांशी नाते जोडणारी आणि समकालीन प्रश्नाविषयी भाष्य करणारी कलाकृती ही कालातीत असते हे स्पष्ट होते.

समकालीन सामाजिक ग्रामीण जीवनाला अनुभवणारे सदानंद देशमुख आपल्यासमोर कालातील वास्तव प्रश्नाचे चिंतन आपल्या कादंबरी लेखनातून व्यक्त करण्यात यशस्वी झालेले आहेत. म्हणूनच त्यांच्या 'बारोमास' या कादंबरीला साहित्य अकादमी पुरस्काराने गौरविण्यात आलेले आहे. त्यांची बारोमास कादंबरी 'एकनाथ' या ग्रामीण तरुणाच्या उध्दवस्ततेच्या कारुण्याची कहाणी आहे. कादंबरीतून साकार होणारी सुशिक्षित बेरोजगार म्हणून विचाराच्या कोंदणात अडकलेली व्यक्तिरेखा एकनाथ ही तत्कालीन ग्रामीण महाराष्ट्रातील प्रत्येक सुशिक्षित तरुणाच्या जीवनाचे प्रतिनिधित्व करणारी व्यक्तिरेखा आहे. बारोमास दुःखाला कवटाळुन जीवन जगणाऱ्या कृषीवल्यांच्या व्यथा—वेदना शब्दांकित करताना सदानंद देशमुख यांची लेखणी प्रस्तुत कादंबरीतून अधिकाधिक गंभीर झालेली दिसून येते. परंपरेपासून शेती करणाऱ्या आपल्या वडिलांचा शेती व्यवसाय पुढे आपण चालू ठेवावा म्हणून सुशिक्षित असूनही एकनाथ बेरोजगार असल्यामुळे शेती व्यवसायाकडे वळतो. परंतु सातत्याने पडणारा दुष्काळ आणि दुबार पेरणी सारख्या संकटांनी हतबल झालेला शेतकरी आणि मोडकळीस आलेला शेतीव्यवसाय एकनाथच्या पदरी निराशाच निर्माण करतो. अशा परिस्थितीत शेतकरी संघटनेत सहभागी होऊन शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी लढण्याची प्रवृत्ती आजच्या सुशिक्षित शेतकरी तरुणांच्या मनात कशी निर्माण होत जाते आणि त्यातून

त्याच्या आयुष्याला कसे वळण मिळत जाते याचे समर्थ चित्रण या कादंबरीतून साकार झाले आहे. शेतकऱ्यांच्या पदरी सातत्याने अपयश येऊन तो आत्महत्येचा पर्याय कसा निवडतो हा प्रवास या कादंबरीतून आलेला आहे. या समकालीन जीवघेण्या वास्तवाचे एवढे समर्थ चित्रण या कादंबरीतून व्यक्त झालेले आहे की, ही कादंबरी वैदर्भीय सामाजिक जीवनाचा दस्तऐवज ठरते असे म्हणणे चुकीचे ठरणार नाही.

या कादंबरीतूनही जुन्या आणि नव्या विचार परंपरेची आणि ग्रामीण संस्कृतीच्या नामशेषाची शोकात्म कहाणी प्रारंभापासून अखेरपर्यंत येत राहते. या अर्थानेही या कादंबरीत संघर्ष पहावयास मिळतो. म्हणूनच सामाजिक ग्रामीण जीवनाला दिवसेंदिवस गिळंकृत करू पाहणाऱ्या व्यवस्थेचा अतिरेक कोठेतरी थांबविणे कसे गरजेचे आहे. या विचाराची आवश्यकता अनुभवास येते. एकनाथ, सुभानराव तनपुरे, मधु आणि त्याची सोनेरी टोळी, दगडू महाकाळ, सुरेश साठे, मालपाणी ,आमदार नरुभाऊ, तेजराव खटके, खंट्या गडी, मुगुटराव, अलका, शेवंताबाई तनपुरे, ममता वारे, मंगल अशा एक ना अनेक व्यक्तिरेखांच्या रूपाने बारोमासची कथा विस्तारत गेलेली दिसून येते. म्हणूनच वर्तमान ग्रामीण समाज वास्तवावर प्रकाश टाकणारी ही एक महत्त्वाची कादंबरी आहे असे म्हणता येते. कादंबरी समकालीन ग्रामीण समाज वास्तव नेमकेपणाने कशी मांडते याविषयी भाष्य करताना प्रा.डॉ.तानाजी राऊ पाटील म्हणतात,''बारोमास कादंबरी मधून शेतकऱ्यांचे न संपणारे दु:ख मांडले आहे. लहरी निसर्गावर अवलंबून असलेली शेती ही शेतकऱ्याला अस्थिर करून कशी सोडते. याचे चित्र मांडले आहे. शेतकऱ्याचा मुलगा मोठ्या जिद्दीने आणि कष्टाने शिक्षण घेतो. शिक्षण सम्राटांच्या भ्रष्टाचारी वृत्तीमुळे त्याला नोकरी लागत नाही तो शेती करीत राहतो.''[५] पाटील यांनी या कादंबरीतून साकार झालेल्या शेतकऱ्यांच्या जीवनाची शोकात्म कहाणी कशी अभिव्यक्त होते हे सिद्ध करून, परंपरेपासून शेती करणाऱ्या शेतकऱ्याच्या मुलाला शेवटी या भ्रष्ट व्यवस्थेला शरण जाऊन स्वत:ला शेतातच गाडून घ्यावे लागते. अशातच त्याच्या सभोवती भयानक परिस्थिती निर्माण होत जाते. सातत्याने येणाऱ्या अपयशामुळे खचून गेलेले शेतकरी आत्महत्या करण्यास प्रवृत्त होतात आणि शेवटी शेतकऱ्यांना आपले जीवन संपवावे लागते. या वर्तमान वास्तवावर या कादंबरीत प्रकाश पडतो. सदानंद देशमुख यांनी या समकालीन वास्तवाचा वेध नेमकेपणाने कसा घेतला आहे ते सांगताना पाटील पुढे म्हणतात,''शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या वर्तमान प्रश्नावर या कादंबरीतून प्रकाश पडतो. आजचे हे वर्तमान वास्तव अतिशय प्रखरपणे सदानंद देशमुख यांनी या कादंबरीत मांडले आहे. त्यामुळे या कादंबरीला समकालीन वास्तव मांडणारी कादंबरी म्हणून विशेष महत्त्व प्राप्त होते. समकालीन वर्तमान वास्तव मांडणे हे अवघड असते. मात्र ही अवघड कामगिरी सदानंद देशमुख यांनी यशस्वीपणे पेलली आहे.''[६] पाटील यांनी पुढे अधोरेखित केलेल्या या मतावरून सदानंद देशमुख यांनी समकालीन समाज वास्तव नेमकेपणाने पकडून साकार केलेली ही कादंबरी कुण्या एकाची न राहता ती समकालीन ग्रामीण सुशिक्षित तरुणांचे प्रतिनिधित्व करणारी कादंबरी ठरते हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नसावी.

सदानंद देशमुख यांनी स्वत: वैदर्भीय सामाजिक जीवनाचे चटके सहन केलेले असल्यामुळे या अनुभवातून साकार झालेल्या त्यांच्या कादंबऱ्या वास्तवाच्या मुशीतून आलेल्या आहेत. सभोवतालाला न्याहाळताना आलेल्या अनुभवातून मांडलेला शब्दप्रपंच कादंबरीच्या निमित्ताने सदानंद देशमुख यांनी मराठी साहित्यामध्ये ठेवला आहे. वाचक, अभ्यासक यांनी सदानंद देशमुख यांच्या कादंबऱ्यांचे विशेष स्वागत केलेले दिसून येते. समकालीन समाज वास्तवाशी तादात्म्य पाऊन झालेल्या आपल्या लेखनाविषयी भाष्य करताना सदानंद देशमुख यांनी मांडलेले मत या ठिकाणी विचारात घेणे महत्त्वाचे वाटते. ते म्हणतात,''समाजव्यवस्थेच्या वर्तुळाचे पहिले आणि शेवटचे टोक कुटुंब असते. मूल्य भेदातून निर्माण होणारे ताण—तणाव ही आजच्या कुटुंबाची जटील समस्या झाली आहे. समकालीन वास्तव लेखनातून अभिव्यक्त करण्याचे व्रत घेतल्यानंतर मानवी जीवनातील प्रेम, इर्श्या, द्वेष, महत्त्वाकांक्षा, अपेक्षा आणि अपेक्षा भंग, निष्ठा, मनोधैर्य या व इतर मानवी मनाशी निगडित असणाऱ्या गुणधर्मांना आपोआप महत्त्व प्राप्त होत असते. शेतकऱ्यांच्या जीवनाला बारोमास वेढून असणाऱ्या जन्मजात वेदनेच्या हुंकारातून ही कादंबरी आकाराला आली आहे. माझ्या भोवतालचा ग्रामीण परिसर हेच तिच्या आणि माझ्या एकूण लेखनाचे प्रेरणास्थान आहे.''[७] सदानंद देशमुख यांनी त्यांच्या अभिव्यक्ती संदर्भात केलेले हे मत प्रकटीकरण देशमुख यांचे अनुभव हे सामाजिक बांधिलकीतून साकार होणारे आणि समाजाभिमुकतेशी एकरूप होणारे कसे

आहेत हे प्रत्ययास येते. म्हणूनच त्यांच्या कादंबऱ्या या प्रामुख्याने वैदर्भीय सामाजिक जीवनाचा दस्तऐवज ठरतात.

## समारोप :

अशा प्रकारे सारांश रूपाने असे सांगता येते की, सदानंद देशमुख यांनी आपल्या समकालीन सामाजिक ग्रामीण जीवन अनुभवाशी एकरूप होऊन, स्वत: अनुभवलेल्या भोगलेल्या ग्रामीण जीवनाच्या व्यथा—वेदना आपल्या कादंबरी लेखनातून साकार केल्यामुळे, त्या व्यथा वेदना केवळ कादंबरीतून साकार झालेल्या व्यक्तिरेखेपुरत्या किंवा गाव चित्रनापुरत्या मर्यादित न राहता, त्या समूह जीवनाचे प्रतिनिधत्व करण्यात यशस्वी झालेल्या आहेत. म्हणूनच विदर्भाच्या सामाजिक जीवनाचा वास्तवदर्शी जीवनपट सदानंद देशमुख यांच्या कादंबरीच्या निमित्ताने सामोरे येतो. तसेच वर्तमान ग्रामीण समाज जीवनातील वास्तव प्रश्नाचे नेमके आकलन या कादंबरीच्या निमित्ताने वाचकांना अभ्यासकांना झाल्याशिवाय राहात नाही.

## संदर्भ :

१. डॉ.माधव जाधव, १९९१ नंतरचे ग्रामीण साहित्य स्वरूप आणि संदर्भ, संपा.डॉ.जयद्रथ जाधव, प्रिंट झॅक, लातूर, प्र.आ.२०१०, पृ.२७.
२. प्रा.लक्ष्मीकांत येळवंडे, सदानंद देशमुख यांच्या कादंबऱ्या : एक आकलन स्मितांजली प्रकाशन, अहमदनगर, प्र.आ.२००७, पृ.२०.
३. डॉ.द.ता.भोसले, साहित्य : आस्वाद आणि अनुभव, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, प्र.आ. २०१२, पृ.१८४.
४. डॉ.आशा सावदेकर, कादंबरीचा आशयवेध, विजय प्रकाशन, नागपूर, प्र.२०१३, पृ.२०५.
५. प्रा.डॉ.तानाजी राऊ पाटील, मराठी कादंबरी : समीक्षा डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्र.आ.२००९, पृ. १५९.
६. तत्रैव, पृ.१५९.
७. सदानंद देशमुख, महाराष्ट्र साहित्य पत्रिका, अंक ३०१ एप्रिल—मे—जून २००२, संपा.प्रा.डॉ.अरविंद वामन कुलकर्णी, पृ.७८.